MHKO100003862022 **नियमीत दिवाणी दावा क्र. ९४/२०२२**

संग्राम नौकुडकर.
//वि//
शाखा व्यवस्थापक,
आयडीबीआय बँक, हलकर्णी.

**निशाणी क्र. १३ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज थर्ड पार्टी अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १, नियम १० अन्वये पक्षकार सामील करणेकरीता दाखल केलेला आहे. वादी यांनी अर्जाचे मागील पानावर आपले म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

०२. थर्ड पार्टी अर्जदार यांचे असे कथन आहे की, प्रस्तुतचा दावा हा मयत गौराबाई कोकीतकर यांचे बँकेत असलेल्या लॉकरसंबंधी आदेशात्मक मनाई मिळणेकरीता दाखल केलेला आहे. मयत गौराबाई कोकितकर हया थर्ड पार्टी अर्जदार यांच्या आजी असून त्या मयत होईपावेतो त्यांची सर्व व्यवस्था, औषधपाणी, सेवासुश्रृषा हे थर्ड पार्टी अर्जदार यांनी केलेले आहे. गौराबाई कोकितकर मयत होणेपूर्वी प्रतिवादी यांचे बँकेतील लॉकरास नॉमीनी म्हणून थर्ड पार्टी अर्जदार यांचे नांव लावणेत आलेले आहे. गौराबाई कोकितकर यांनी त्यांचे हयातीमध्ये थर्ड पार्टी अर्जदार यांचे नांवे दिनांक २९/०६/२०१५ रोजी अखेरचे इच्छापत्र केलेले आहे. त्यामुळे, थर्ड पार्टी अर्जदार यांचा गौराबाई कोकितकर यांचे मिळकतीमध्ये अधिकार आहे. असे असताना, वादी यांनी गौराबाई कोकितकर यांची मानसिक स्थिती ठीक नसताना कोरोनाच्या कालावधीमध्ये त्या आजारी असल्याचा गैरफायदा घेऊन बोगस, खोटे, बनावट व हक्कविरहीत असे तथाकथीत मृत्यूपत्र केलेचे भासवून सदरचा दावा दाखल केलेला असून तो थर्ड पार्टी अर्जदार यांचेवर बंधनकारक नाही. वादी हे बोगस व बनावट मृत्यूपत्राआधारे हक्क सांगत असलेने व थर्ड पार्टी अर्जदार यांना प्रतिवादी म्हणून सामील न करता सदरचा दावा दाखल केला असलेमुळे थर्ड पार्टी अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. थर्ड पार्टी अर्जदार यांचा अर्ज मंजुर न झाल्यास त्यांचे कशानेही नुकसान होणार आहे. सबब, अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

०३. वादी यांनी सदर अर्जाचे मागील पानावर म्हणणे दिले व असे कथन केले की, प्रस्तुत अर्जातील संपुर्ण मजकुर खोटा व चुकीचा आहे. प्रस्तुत अर्जातील मृत्यूपत्राचा

केलेला उल्लेख संपुर्ण चुकीचा व खोटा आहे. मयत गौराबाई कोकीतकर यांचेशी थर्ड पार्टी अर्जदार यांचा कोणताही हक्कसंबंध नव्हता व नाही. वादी हेच मयत गौराबाई कोकीतकर यांचे दिनांक ०८/०३/२०२१ च्या नोंदणीकृत मृत्यूपत्राने कायदेशिर वारस आहेत. त्यामुळे, वादी यांनी प्रस्तुतचा थर्डपार्टी अर्जदार यांचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्याची विनंती केली.

०४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत दावा वादी यांनी मयत गौराबाई कोकीतकर यांनी त्यांना करुन दिलेले दिनांक ०८/०३/२०२१ रोजीचे मृत्यूपत्राआधारे प्रतिवादी बँकेत असलेले लॉकर मधील वस्तु मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुतच्या अर्जान्वये अर्जदार यांनी देखील मयत गौराबाई कोकीतकर यांनी दिनांक २९/०६/२०१५ रोजी त्यांचे नांवे मृत्यूपत्र केलेले असून सदर लॉकरकरीता त्यांना नॉमीनी केले असलेचे कथन केले आहे. त्यामुळे, प्रस्तुत दाव्यात दावा मिळकत म्हणून नमुद केलेल्या लॉकर संदर्भात प्रस्तुत अर्जदारास नॉमीनी केलेले असल्याने आणि त्यांच्या नांवे देखील मृत्यूपत्र असलेने ते प्रस्तुत दावा निकाली काढणेकरीता आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे, त्यांना दाव्यात पक्षकार केलेशिवाय दाव्याचा निकाल गुणदोषावर देणे अडचणीचे होणार आहे. सबब, अर्जदार यांना दाव्यात आवश्यक पक्षकार म्हणुन सामील करणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**-: आदेश :-**

०१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२. थर्ड पार्टी अर्जदार यांनी मागणी केलेप्रमाणे वादीने त्यांना दाव्यात प्रतिवादी क्र.२ म्हणुन समाविष्ट करुन तशी दुरुस्ती मुदतीत केलेनंतर त्याची प्रत दाखल करावी.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

सही/-

**( एस. ए. राठोड )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः ०१/१२/२०२३.

I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 01/12/2023 |
| Order signed by P.O. on | 01/12/2023 |
| Order uploaded on | 01/12/2023 |